**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०९ जुलै २०२३**

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४४६/२०२३ भादवि ३०२,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०५/०७/२०२३ रोजी रात्री १२.०० वा चे सुमारास, हॉटेल बी प्रकाश बार, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/०७/२०२३ रोजी १९.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विलास नारायण बोल्ली, वय- ४८ वर्षे, रा. घर नं. ३४/४, साईबाबा चौक, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर, सध्या- आरफात नगर, शिवलिंग मंगल कार्यालयाचे शेजारी, इंद्रजीत नारायणकर यांचे घरात भाडयाने, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | तीन अनोळखी इसम |
| **मयताचे नाव** | : | मुनाकुमार रामाधार सिंह, वय- ४४ वर्षे, वार्ड क्रं. ६, मु.पो. पोगर, ता. रतीगंज, जि. औरंगाबाद, राज्य- बिहार, सध्या- अरीहंत टेक्सटाईल इंडस्ट्रीज, लोकमंगल हॉस्पीटल जवळ, एमआयडीसी, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील मुनाकुमार रामाधार सिंह हा हॉटेल बी प्रकाश बार येथे जेवणाकरीता गेला असताना तेथे त्याची तीन अनोळखी इसमाबरोबर बाचाबाची होवून त्यात त्यास सदर तीन अनोळखी इसमाने हाताने, लाथाबुक्याने व काचेची बाटली व काठीने मारहाण केल्यानेच मुनाकुमार रामाधार सिंह हा मयत झाला आहे म्हणून फिर्यादीची तीन अनोळखी इसमांविरुध्द तक्रार आहे. तपासः- पोनि- बोंदर - **९५११८२०५३०** |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २८०/२०२३ भादवि ३५३,३३२,२९४,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०९/०७/२०२३ रोजी ०१.१५ वा चे सुमारास, रंगा चौक येथील सार्वजनिक रोडवर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/०७/२०२३ रोजी ०५.०८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोहेकॉ/ १२५० गणेश रामचंद्र धुमाळ, नेम- जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मोहसिन नन्नुभाई मुल्ला, २) वसीम नन्नुभाई मुल्ला, रा. ६७८, साखर पेठ, महिबुब हॉटेल समोर, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे जेलरोड पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्त दरम्यान पेट्रोलींग करीत असताना वरील ठिकाणी सार्वजनिक रोडवर मोहसिन शेख व इतर ०८ ते १० लोक रस्त्यावर क्रिकेट खेळत होते. आरोपीत क्रं. १ व २ यांना समजावून घरी जाण्यास सांगुन सरकारी काम करीत असताना फिर्यादीस कर्तव्यापासुन परावृत्त करणेसाठी फिर्यादीस अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन हम यहॉ के बॉस है. ऐसे पोलीस लोगा बोहोत देखे असे म्हणून आरोपीत क्रं. १ हा म्हणाला की मेरे उपर बोहोत केस है. तेरे को छोडता नही. तुझे खल्लास करता. असे म्हणून फिर्यादीस आरोपीत क्रं. १ व २ यांनी धक्का बुक्की केली. तसेच आरोपीत क्रं. १ याने त्याचे हातातील चावीने फिर्यादीच्या तोंडावर मारत असताना फिर्यादी डावा हाताने अडवत असताना फिर्यादीच्या हाताच्या मधल्या बोटास मारुन जखमी करुन जेलरोड पोलीस ठाणे |

| | | |
|---|---|---|
| | | येथे आणल्यानंतर शिवीगाळ करुन फिर्यादीच्या अंगावर धावून येवून फिर्यादीचे कर्तव्य बजावित असताना कर्तव्यामध्ये अडथळा केला आहे म्हणून. तपास:- पोसई- राठोड - ९९६००८२९७५ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४५४/२०२३ भादवि ३५३,३३२,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०७/०७/२०२३ रोजी २०.०० वा चे सुमारास, शासकीय विश्रामगृह, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/०७/२०२३ रोजी १९.१८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | किरण रतन चव्हाण, वय- ५४ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी नं. १, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मनोज भोसले, २) आकाश बोळे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे पी डब्ल्यु डी खात्यात सेवेत आहेत. सध्या शासकीय विश्रामगृह येथे चौकीदार म्हणून कार्यरत आहेत व शासकीय रुम भाडयाने देणेचे काम करतात. यातील फिर्यादी हे शासकीय काम करीत असताना, यातील फिर्यादी सोबत काम करणारे वरील आरोपीत यांनी फिर्यादीस आमचे ७ ते ८ मित्र लोक आले आहेत. त्यांना एक एअर कंडीशन रुम द्या असे सांगितले तेव्हा फिर्यादीने त्यांना एअर कंडीशन रुम उपलब्ध नाही असे सांगितलेवरुन वरील आरोपीतांनी फिर्यादीची गच्ची पकडुन गालावर चापट मारली व घाण घाण शिवीगाळ केली आहे म्हणून. पोहेकॉ/ ९२४ नदाफ - ९७३०४८११९६ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४५३/२०२३ भादवि ३८० प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०४/०७/२०२३ रोजी २०.३० वा ते २१.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/०७/२०२३ रोजी ०३.३९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अंजली कुलकर्णी, वय- ३२ वर्षे, रा. विद्या नगर भाग- १, पाथरुड चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १७,५००/- रु त्यात २.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे लेडीज अंगठी, व १ ग्रॅम वजनाची सोन्याची लेडीज अंगठी |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे राहते घराचे खोलीच्या खिडकीत आतील बाजुस ठेवलेले नमुद वर्णनाचे व किंमतीचे ऐवज उघडया खिडकीतुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेले आहे म्हणून. तपास:- पोसई- माळी - **८८८८८५२०९७** |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४३५/२०२३ भादवि २७९,३३७,३३८, मोवाकाक १८४,१३४(अ)(ब) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०८/०७/२०२३ रोजी ०४.०० वा ते ०५.०० वा चे दरम्यान, न्यु लक्ष्मी चाळ, मरीआई चौक विठ्ठल मंदिराचे जवळील रोडचे फुटपाथ जवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/०७/२०२३ रोजी १५.२५ वा. |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादीचे नाव** | **:** | अस्लम महम्मद रफिक बागवान, वय- २८ वर्षे, रा. ४५ जुना देगाव नाका, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात वाहन चालक |
| **जखमीचे नाव** | **:** | म.रफिक अब्दुलसाब बागवान |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे वडील म. रफिक अब्दुलसाब बागवान हे नमुद ठिकाणाहुन पायी चालत जात असताना, अज्ञात येणाऱ्या जाणाऱ्या कोणत्यातरी वाहनाने त्यांना धडक देवून गंभीर जखमी केले आहे त्यात फिर्यादीचे वडीलांचे डोक्यास गंभीर दुखापत झाली आहे म्हणून. तपासः- मपोना/ १७५ चौधरी - ९५८८४५७९५६ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ४३६/२०२३ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि १८/०७/२०२१ रोजी ते सप्टेंबर २०२१ चे दरम्यान, फिर्यादीच सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ०८/०७/२०२३ रोजी १६.४२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | मेघा नितेश लोंढे, वय- ३१ वर्षे, रा. २७७, गवळी वस्ती, लक्ष्मी पेठ रेशन दुकानाजवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) नितेश लोंढे- पती, २) सुनंदा लोंढे- सासु, ३) दिनेश लोंढे- दिर, ४) अस्मिता लोंढे- जाऊ, सर्व रा. ३१, चंद्रलोक नगर, जुळे सोलापूर, ५) प्रकाश सुखदेव कदम, ६) अनुजा ब्रम्हदेव घुले, ७) ब्रम्हदेव घुले, सर्व रा. सोनी नगर, आमराई, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी संगनमत करुन, फिर्यादीस तु आमचे घरात नांदायची लायकीची नाही, तुला आई वडीलांकडुन १० लाख रुपये घेवून ये परंतु तु व तुझे आई वडील आमचे ऐकत नाही. तु आमचेकडे नांदायचे नाही, तुला सासरी नांदायचे असेल तर तु १० लाख रुपये घेवून ये असे म्हणून फिर्यादीस उपाशी ठसेनू, आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस माहेरी आणुन सोडले आहे. तसचे वडील व भाऊ यांनी फिर्यादीस नादावयास घेवून जाण्यास विनंती केली परंतु वरील आरोपीत हे तुम्ही दुकानाच्या व्यवसायाकरीता १० लाख रुपये पाठवुन दया तरच तुमच्या मुलीस आम्ही नांदवु असे म्हणून सासरी नांदण्यास घेवून जाण्यास नकार दिला आहे. सदर बाब मध्यस्थी आरोपीत क्रं. ६ व ७ यांना सांगितले असता त्यांनी ऐकुन न घेता उलट सासरी नांदायचे असेल तर जे सासरचे लोक सांगतात तसे करा व आम्हाला काही एक सांगायचे नाही. तुम्ही आमचे कडे येवू नका असे म्हणन फिर्यादीस दमदाटी केली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १५७२ दराडे - ९८५०५५१५७२ |